दिनांकः15 फेब्रुवारी 2014

# एका दुःस्वप्नाचा अंत

**-अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

एका दुःस्वप्नाचा अंत झाला. दिल्लीत आतापर्यंतची सर्वात खराब राज्य सरकारने राजीनामा दिला. आम आदमी पक्षाच्या सरकारने उप-राज्यपाल यांच्याकडे राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. मागील 49 दिवस एक अपरंपरागत सरकार पाहायला मिळाली आहे. ही एक अशी सरकार आहे जिचा कोणताही अजेंडा नव्हता आणि ज्याची कोणतीही विचारधारा नव्हती. ती लोकांची वाहवा मिळवणे आणि लोकांना विचलित करणारी सरकार होती.

चालाख राजनीति आणि कोणत्या प्रकारची शासन प्रणाली नाही- हेच दिल्लीच्या आम आदम पक्षाच्या सरकारचा ब्रीदवाक्य होते. ही एक अशी सरकार होती जिला बहुमत प्राप्त नव्हते. तिच्याकडे फक्त 28 जागा होत्या. भाजपा तिच्यापेक्षा मोठा पक्ष होता. आम आदमी पक्षाला कॉंग्रेसच्या समर्थनामुळे बहुमत प्राप्त करण्यासाठी काही खटकले नाही. त्यांचे अधिकतर आमदार अनुभवहिन होते. त्यांच्यात परिपक्वतेचा अभाव होता. अनेकदा ते विचित्र प्रकारे व्यवहार करत होते. त्यांची आंदोलनकारी भूमिका होती मात्र कोणत्याही प्रकारची शासन व्यवस्था स्थापित करण्यासाठी ते बाजूला होते.

काय आम आदमी पक्ष सरकारने दिल्लीत पिण्याच्या पाण्यासाठी कनेक्टीवीटी वाढविण्याचा निर्णय घेतला होता. काय ते दिल्लीत आरोग्य सुविधा वाढविण्यासाठी योजना बनवत आहेत काय त्यांनी दिल्लीत तांत्रिक शिक्षा संस्थानांचा विस्तार करण्यासाठी कधी विचार केला दिल्ली मेट्रोला पुढील टप्प्यात घेऊन जायचे काय झाले काय आणखी फ्लायओवर आणि चांगली पीडब्ल्यूडी रस्ते बनविण्याचा विचार कधी त्यांच्या डोक्यात आला. हे सर्व असे क्षेत्र आहेत जी मोठ्या महानगरात राहणा-या लोकांचे राहणीमान सुधारु शकते. हेच शासन प्रणालीचे प्रमुख क्षेत्र आहेत. 49 दिवसाच्या सरकारकडे या मुद्द्यांबद्दल विचार करण्याचा वेळ नव्हता.

त्यांनी आपली भूमिका फक्त लोकांना विचलित करण्यापर्यंतच सीमित ठेवली. त्यांनी गृहमंत्री, उप राज्यपाल, दिल्लीचे पोलिस आयुक्त आणि आफ्रीकी महिलांच्या विरोधात उत्तेज पसरली. त्यांची भुमिका फक्त खोटे तयार करणे आणि काल्पनिक शत्रू तयार करणे आणि नंतर त्या काल्पनिक शत्रूंवर हल्ला करण्याच्या ताकदी बद्दल अपप्रचार करणे होते. त्यांच्यात हा अहंकार भरला होता की फक्त त्यांचे नेत ईमानदार आहेत आणि बाकी सर्व आपसात समझोता करतात. सरकारमध्ये प्रत्येक दिवशी ते आपली लोकप्रियता कमी करत आहेत. पक्षाला हा आभास झाला होता की, सचिवालयमध्ये बसलेले त्यांचे नेते खुप निष्काळजीपणाने व्यवहार करत होते. त्यांना रस्त्यावर येणे अधिक चांगले वाटत होते. त्यांनी आपल्यासाठी बाहेर पडण्याचा मार्ग शोधला होता. त्यांचे जन लोकपाल बिल शेवटपर्यंत गूढ बनले होते. विधेयकाची लोकपाल विषय वस्तु केंद्रीय कायद्यापेक्षा वेगळी नव्हती. मात्र ते एक खोटा अपप्रचार करु पाहत होते की, त्यांचे विधेयक केंद्रीय कायद्याच्या तुलनेत एक क्रांतीकारी आहे. त्यांनी विधान सभेकडून मंजुरीसाठी एक परंपरागत प्रक्रिया न स्वीकारण्याचा प्रयत्न केला तरच राजीनाम्यासाठी बहाणा बनवू शकणार.

आम आदमी पक्ष सरकार बाहेर झाली आहे. त्यांनी अशा अनेक नेत्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले आहे जे एका वैकल्पिक राजकारणाला उभारी घेताना पाहणार होते. त्यांचे वैकल्पिक राजकारण कोणत्याही शासन व्यवस्थेच्या लोकप्रियता, जनतेला विचलित करणे, खोटे बोलणे हे होते. देवाचे आभार, एका भयानक अनुभवाचा अंत झाला.